# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

**नियामक मंडळाची ५३ वी बैठक दिनांक १४ नोव्हेंबर २००७**

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली व मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम वगळून) यांचे उपस्थितीत नियामक मंडळाची ५३ वी बैठक दि. १४.११.२००७ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आले.

**ठराव क्र. ५३/१**

**"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ५१ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

ठराव क्र. ५३/२

**"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या चक्री पद्धतीने झालेल्या ५२ व्या बैठकीतील ठराव कायम करण्यात येत आहेत."**

ठराव क्र. ५३/३

**"वर्ष २००६-०७ मधील सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट व साध्य यांचा मंडळनिहाय आढावा" हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.**

ठराव क्र.५३/४

**"सन २००७-०८ चे मंडळनिहाय,प्रकल्पनिहाय उपलब्ध निधीचे नियोजन व सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट" हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर करण्यात आला असल्याने या बाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."**

ठराव क्र.५३/५

**"वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमातील वर्ष २००६-०७ चे आर्थिक व भौतिक साध्य" हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही''**

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

ठराव क्र. ५३/६

बांधकाम संघटनेने सिंचन निर्मिती बरोबरच निर्माण होणारी सिंचन क्षमता, प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र पाणीवापर संस्था स्थापन करुन त्यांना हस्तांतरीत करणे हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत कोणताही ठराव करण्यात आला नाही.

ठराव क्र. ५३/७

" ठराव करण्यांत येतो की,

अ) टेमघर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जाणा-या ४.५० हेक्टर वनजमीनीची एन.पी.व्ही. (नेट प्रेझेंट व्हॅल्यू) रक्कम रु.४०.५० लक्ष ही वन खात्याकडे भरण्यास शासनाने पत्र क्र. टेमघर-१००६/२८५३/(६३९/०६) मोप्र-१ दि. २.११.२००७ अन्वये अनुमती प्रदान केली असल्याने याबाबत शासन निर्देशानुसार कार्यवाही करावी.

ब) लघु पाटबंधारे साठवण तलाव पांडोझरी (मोटेवाडी) ता.जत.जि.सांगली साठी बुडीत होणा-या २.१८ हेक्टर वनजमिनीसाठी एन.पी.व्ही. ची उर्वरित रक्कम रु. १२.६४ लक्ष वन विभागास अदा करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ५३/८

"महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास मंडळाकडील इतर महामंडळाची देणी माफ करणेस शासनास विनंती करणेचा विषय मागे घेण्यात आल्यामुळे कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

ठराव क्र. ५३/९

"ठराव करण्यांत येतो की, सन २००४-०५ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या लेखापरिक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी निर्गमित केलेला अलग लेखापरिक्षण अहवाल (S.A.R.) अनुपालनासह विधानमंडळासमोर सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."



| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |

ठराव क्र. ५३/१०

"ठराव करण्यात येतो की,

१. अे. आय. बी. पी. अंतर्गत मंजूर घटकांची कामे चालू निविदेअंतर्गत करुन घेण्याचा नियामक मंडळाचा ठराव क्र. ३७/४ दि. १४.११.२००७ पासून रद्दबातल करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. यापुढे अे. आय. बी. पी. अंतर्गत मंजूर घटकांची कामे केवळ स्वतंत्र निविदा प्रक्रियेद्वारे पूर्ण करावीत.

२. टंचाई निवारण कार्यक्रम टप्पा-१ व टप्पा-२ यांची मुदत संपल्याने टंचाई निवारण कार्यक्रमातील मंजूर घटकांची कामे चालू निविदेअंतर्गत करुन घेण्याचा नियामक मंडळाचा ठराव क्र. ३९/२ दि. १४.११.२००७ पासून रद्दबातल करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ५३/११

"ठराव करण्यांत येतो की,

१) सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या सन २००६-०७ साठी (जुलै-२००६ ते जून-२००७) मध्ये योजनेच्या मुख्य कालवा कि.मी.२२ पर्यंत अंदाजे १२५० हेक्टर क्षेत्रांसाठी ३ आवर्तनात तसेच सन २००७-०८ साठी (जुलै-२००७ ते जून-२००८) मध्ये योजनेच्या मुख्य कालव्याचे कि.मी.२२ व डावा कालवा कि.मी.१२ पर्यंत अंदाजे २५०० हेक्टर क्षेत्रांसाठी खरीप हंगाम एक, रब्बी हंगाम एक व उन्हाळी हंगाम तीन या प्रमाणे ५ आवर्तनात पाणी देण्यांच्या नियोजनांस नियामक मंडळांची मान्यता देण्यांत येत आहे.

२) वरील १ प्रमाणे पाणी देण्यासाठी सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या सन २००६-०७ साठी योजनेच्या मुख्य कालवा कि.मी.२२ पर्यंत रुपये १८५७/- प्रति हेक्टर प्रति आवर्तन या दराने, तसेच सन २००७-०८ साठी योजनेच्या मुख्य कालव्याचे कि.मी.२२ व डावा कालवा कि.मी.१२ पर्यत रुपये १५२९/- प्रति हेक्टर प्रति आवर्तन या दराने आकारणी करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

३) वरील २ प्रमाणे वसूल झालेल्या रकमेतून सन २००६-०७ साठी (जुलै-२००६ ते जून-२००७) तसेच सन २००७-०८ साठी (जुलै-२००७ ते जून-२००८). मध्ये चालू केलेल्या पंपाची वीज देयके अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.



| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |

ठराव क्र. ५३/१२ :

"ठराव करण्यांत येतो की, श्री. ज्ञा. द. शिंदे, ॲडव्होकेट यांची महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कायदे सल्लागार पदी नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ५३/१३

"ठराव करण्यात येतो की, सन २००६-०७ या वर्षाचे प्रकल्प विकास लेखा पत्रक व ३१.०३.२००७ अखेरचा ताळेबंद याद्वारे स्विकृत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ५३/१४

''ठराव करण्यांत येतो की, पवना धरणासाठी संपादित करण्यांत आलेली मौजे ब्राम्हणोली येथील गट क्र. ३६८, ३७१, ३७२, ३७३ व ३७८ मधील एकूण ५.७८ हेक्टर जमीन शासनाच्या जलसंपदा विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव महामंडळाने जलसंपदा विभागाकडे सादर करावा.''

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सर्व सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.



सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे